॥ खंड ०१ ॥
॥ गण नं. ०५ ॥
॥ मुळावरचा गण ॥

॥ भजो भजो गणपती ॥

या मुळ गणांच्या चरणांची पलट असलेला पलटगण खंड०७/०२ मध्ये दिलेला आहे.

॥ कळसुत्र तुम्हा हाती । भजु भजु गणपती
अवघा कार तुम्हा हाती । भजा भजा गणपती ॥ घृ ॥

॥ देहे या धरून । राया सोयंम् रूपी आले ।
सेरूप दावा जगाले ॥
॥ याहीच्या शिराया मुकुट । गळा माळ वैजावंती ।
टिळा शोभे लल्लाटी ॥
॥ पायी या पद्म । आंगी चंदनाच्या उटी ।
देहे वज्र अबंर याहीची । देहे भरून उरली याहीची ॥
॥ याहीच्या चरणी उध्दार । धरणी आहे कंचनाची ।
अवघा प्रेम भाव याहीशी । देहे जागृत करशी ॥

॥ आहो यवगाची गणीता । ठाउक आहे भैसाशी ।
अवघा कार याहीच्या हाती ॥

भजने :-
॥ भजा भजा गणपती । कळसुत्र कळा/दोरी या देवाच्या हाती ॥
॥ कळसुत्राचा मालक । कळसुत्र कळा/दोरी या देवाच्या हातात ॥
॥ उभा गणराजा गणपती । अवघा कार आहे या देवाच्या हाती ॥
॥ तुम्हा पासुन अवघे जन । कार करा, महाराजा येवुन ॥
॥ भजनी उभा राहय गणराजा । नाम तुझं.....।
चतुर्पती गिण्यान दयाहो मज । चतुर्पती बिरद कर गा उभं ॥
॥ गणराज महाराज । उभे राहा येवुन ।
अमृताची गंगा वाहे । याहीच्या मुखातुन ॥
॥ गणराज महाराज...व्हा प्रसन्न । आम्ही करतो सुमरण रात्रंदिनं ॥
॥ गणराज महाराज.. मोक्ष देणं । आम्ही करतो तुमचे सुमरन रात्रंदिन ॥
॥ गणराज महाराज व्हावे साहय । ही अरज आता लेकरांची आहयं ॥
गजर :-
॥ भजनी महाराज बोले । जैसा प्रभुराज डोले ।
देल्ली भेट बहु लाभ झाला आम्हाले ॥

-: शब्दार्थ :-

सोयंम् :- आपरूप, स्वतःहुन । **शिराया** :- डोक्यावर । **लल्लाटी** :- कपाळी **कंचनाची धरणी** :- सोन्याप्रमाणे चकाकी असणारी देह/धरणी, तेजोमय आरावलयाची देही ।

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥